
# जीवन संघर्षातील प्रसन्नपुरूष

संपादक
प्रा. डॉ. विनोद गायकवाड
प्रा. डॉ. संजय कांबळे



Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

जीवन संघर्षातील प्रसन्नपुरुष
Jeevan Sangharshatil Prasannapurush

संपादक
**प्रा. डॉ. विनोद गायकवाड**
प्रमुख, मराठी विभाग, राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव.
भ्रमणध्वनी- ०९९४५०१५३६४.
**प्रा. डॉ. संजय कांबळे**
मराठी विभाग, राणी चन्नमा विद्यापीठ, बेळगाव.
भ्रमणध्वनी- ०९१६४३५८४८९

प्रकाशक
**अनिल म्हमाने/शोभा चाळके**
संचालक
**संवाद प्रकाशन प्रा. लि.**
८७३, क/२, सी वॉर्ड, सिद्धीश्री प्लाझा,
राजाराम रोड, कोल्हापूर- ४१६००२
मो. ९८२२४७२१०९, ९८९०५५४३४०
Email-anilnirmiti@gmail.com

प्रथमावृत्ती : १४ एप्रिल २०१९
मुखपृष्ठ : गंगाधर म्हमाने
मुद्रक : मिरर ऑफसेट, कोल्हापूर

**ISBN** : 978-93-87322-09-7

**मूल्य : रु. ५१०/-**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani

# अनुक्रमणिका

१. आंबेडकरी चळवळ व्यापक अन्वयार्थ
प्रा. दत्ता भगत /२१
२. कलासक्त बाबासाहेब
डॉ. माधुरी सुटे / ३५
३. कुटुंबवत्सल डॉ. बाबासाहेब आंबेडकर
प्रा. डॉ. सा. द. सोनसळे /४३
४. कर्तव्यदक्ष व दयाशील बॅरिस्टर- डॉ. भीमराव रामजी आंबेडकर
राम कांबळे /६४
५. प्रसन्न विनोदवृत्तीचे बाबासाहेब
प्रा. नामदेव मल्लापा मधाळे/७०
६. मुस्लिम मराठी कवितेवर आंबेडकरी विचारांचा प्रभाव
प्रा. डॉ. रफिक सूरज /७८
७. बाबासाहेबांची मानवकेंद्रित पत्रकारिता
प्रा. डॉ. मनीषा नेसरकर /८४
८. स्त्री स्वातंत्र्याचे उद्गाते
प्रा. मधुकर निवृत्तीराव बैकरे /९१
९. स्त्रियांच्या सामाजिक न्याय मिळविण्यामध्ये
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
डॉ. चेतना. प्र. सोनकांबळे /१०२
१०. स्त्री स्वातंत्र्याची मुहूर्त मेढ
प्रा. डॉ. शर्मिला बाळासाहेब घाटगे /११०
११. स्त्री स्वातंत्र्याचा मूलगामी वेध
प्रा. डॉ. अनिल काळबांडे /११९



PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# कुटुंब वत्सल डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. सा. द. सोनसळे**
मराठी विभाग,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी.
मो. नं. ८३७९०५४०२५/९९७०५८७८२५

---

अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठासमोर विश्वभूषण, प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आठराफुटी पुतळा ऊभा केला आणि या पुतळ्याच्या चबुतऱ्यावर लिहिले, 'द नॉलेज ऑफ सिंबॉल' बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचे प्रतिक आहेत. कारण त्यांनी मुंबईच्या हिंदू कॉलनीत पुस्तकांसाठी राजगृह बांधले. ते विविध विषयांवर वाचन करीत आणि विविध विषयांवर पुस्तके सुद्धा लिहित असत. वाचन-लेखनात ते इतके रमून जात असत की, त्यांना जेवण आणि झोपेचे लक्ष राहत नव्हते. त्यांनी दिवसाचे अठरा ते एकविस तास अभ्यास केला आहे. कोलंबिया विद्यापीठात त्यांनी सलग चोविस तास अभ्यास केला. वाचनाचा हा जागतीक विक्रम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञानाच्या क्षेत्रातील जगातील एकमेव आश्चर्य आहे! आणि म्हणूनच जगातील विविध राष्ट्राच्या विद्यापीठासमोर बाबासाहेबांचे पुतळे तेथील जनतेने, शासनाने ऊभे केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रजासत्ताक भारताचे राष्ट्रपिता आहेत! अखंड भारताचे लाडके सुपुत्र आहेत. मानवतेला लागलेला काळीमा नष्ट करणारे प्रज्ञासूर्य आहेत. बाबासाहेब जगातील शोषीत, कष्टकरी, उपेक्षीत, बहिष्कृत-अस्पृश्य, दीन-दुबळ्यांना जोडणारा दुवा म्हणूनच ते सनातन्यांचा हेवा होते. विरोधकांसाठी वज्रासारखे असणारे बाबासाहेब समाजासाठी, मानवतेसाठी कुटुंबासाठी मऊ लोण्याहूनही मऊमऊ होते.

त्यांच्या आयुष्यभराच्या मानवमुक्ती लढ्यामुळे कदाचित अभ्यास

संशोधकांचे बाबासाहेबांच्या विनोदाकडे जसे दुर्लक्ष झाले, तसे त्यांच्या कुटुंब वत्सलतेकडेही दुर्लक्ष झाले असावे असे वाटते. हे मुद्दामहुन केले जाते असे नव्हे तर, या महापुरुषांच्या जीवनाला अनंत पैलू आहेत. एक एक पैलू अफाट आणि आश्चर्यकारक आहे. आयुष्यभर लढलेला हा महायोद्धा वाघासारखा जगला. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात अमूल्य अशी कामगिरी केली. अथक परिश्रम घेऊन जीवनातील कठिण प्रश्नांवर त्यांनी उत्तरे शोधली. ती थक्क करणारी आहेत. म्हणूनच तर इथल्या संवेदनशिल कविंना ते स्वतःच्या मुलापेक्षाही लहान वाटतात. आणि आईपेक्षाही महान वाटतात. बाबासाहेब फार कनवाळू अंतःकरणाचे होते. त्यांच्या वात्सल्यपूर्ण हळव्या ममतेचा पैलू दुर्लक्षित राहतो. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू. त्यांच्याबद्दल कांही असेही तर्क केले जातात. १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवमुक्तीच्या लढ्यात आयुष्यभर लढले. म्हणून त्यांना कुटुंबाकडे लक्ष द्यायला वेळ नसेल असे मानले जाते. २. ते विरोधकांवर आपल्या ज्ञानाने वैचारिक हल्ले करीत. त्यामुळे ते अनेकांना कठोर वाटतात. ३. अन्याय अत्याचाराने दररोज समाज हैराण होत होता, त्यावर चिंतन करणारा त्यांचा चेहरा लोकांना उग्र वाटायचा.

या कारणांमुळे बाबासाहेब प्रेमळ, ममताळू नसतील असा एक गैरसमज होवू शकतो. त्या उपेक्षित पैलूंचाच तर शोध घ्यायचा आहे. या शोधाचे पुढील गृहीतके आहेत. त्यात १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रद्धाळू होते, ते प्राणीमात्रावर दया करीत, २) ते जगात कुठेही असले तरी त्यांचे लक्ष कुटुंबावर होते, ३) ते माऊलीहून मायाळू होते, चंद्राहूनी शितल होते. जणू वात्सल्यचा कल्लोळ होते. या गृहितकांना धरून, प्रज्ञारूपी महासूर्याच्या जीवन प्रवासाचा शोध घ्यावा लागेल. त्यांच्या बद्दल असेही लिहिले जाते की, बाबासाहेब फार रागीट होते. ते मुलांना रागवत होते, संसारात त्यांचे लक्ष न देता ग्रंथाचे वाचन करीत त्यामुळे पत्नी आणि मुलांचा त्यांना विसर पडत असे.असे गैरसमज आहेत. त्यामुळेच 'पुस्तकात वामन भीम सदा रमला' ही वामनदादा कर्डकांची गीतांची ओळ हेच सांगते. अस्पृश्यांचे दुःख अफाट आहे. या देशात पशूला देव म्हणून पुजतात आणि माणसांना अस्पृश्य समजतात. यात जोतिबा फुले म्हणतात, 'विद्वान क्षुद्रांनो जागे कारे व्हाना । तपासूनी पहाना ब्रह्म घोळ.' तो ब्रह्मघोळ तपासून

भारतातील रोगी समाज निरोगी करावयाचा होता. म्हणून बाबासाहेबांचा पुस्तकांचा एक समांतर संसार होता. त्यांची लेखणी जणू रमाईची आणि माईसाहेबांची ती सवतच होती. ते पुस्तकांवर मुलांइतकेच प्रेम करीत. स्वतःचे पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्यांना अपत्य जन्माइतकाच आनंद व्हायचा. माणूस आपल्या मुलांबाळांसाठी घर बांधतो. त्यांनी मुलांसाठी तर घर बांधलेच पण, पुस्तकांसाठीही राजगृह बांधले. ही त्यांच्या जीवनाची एक बाजू आश्चर्यकारक आहे. तर दुसरे असे की, ते प्राणीमात्रांवर प्रेम करीत. त्यांनी कुत्रा पाळला होता. तो कुत्रा त्यांच्या पायथ्याला रात्री बसून असे. त्यांनी कर्नाटकातून एक हरणाचे पाडस मुंबईला पाळण्यासाठी नेले होते. पण, ते मरून गेल्यावर बाबासाहेब परदेशातील आपल्या मैत्रीणीला पत्र लिहून आपले दुःख कळवतात.

आयुष्यभर संघर्ष, लढे ऊभारणारे बाबासाहेब मग संसार कसे करत होते? प्रश्न विचार करण्यासारखा आहे. तो कुणीही ना कबूल करणार नाही. त्यांना जवळून पाहिलेले वामनदादा कर्डक लिहितात, ''काय सांगू तुला आता, भीम माझा कसा होता । लेकराला जशी माता भीम माझा तसा होता.'' 'सामाजिक चळवळीचे संघर्ष लढे लढतांना त्या बलाढ्य भीमात हळवं, कोमल मन होतं. म्हणून तर संपूर्ण जग भीमरावांना बाबासाहेब म्हणतं. समाजाचे पिता अन् माताही ते होते. आईचं वात्सल्य त्यांच्या हृदयात साठवलेलं होते.म्हणूनच ते स्वतःच्या आईविषयी सांगतात, ''माझा जन्म मध्यरात्री बाराच्या ठोक्याला झाला. त्यावेळी माझे वडिल कामावर होते. आणि माझ्या आईचं बाळांतपण चाललं होतं, माझा पिंड फार मोठा होता. परंतु एकदा दायीने त्यांना येऊन सांगितले, घरात जो मुलगा झाला त्यावेळी बरोबर बाराचे ठोके पडून गेले होते.''[३] जन्माच्या वेळी भीमाई म्लान होऊन पडली होती. तीच्या त्रासाबद्दल बाबासाहेब अगदी कळवळून सांगतात. पुढे ते पाच वर्षाचे असताना आईचा मृत्यू होतो. त्यावेळच्या एका प्रसंगाविषयी चां. भ. खैरमोडे लिहितात, ''सर्व कुटुंब साताऱ्याला होते. ते (रामजी) सातारा सोडून गेले तेंव्हा भीमाबाईच्या मस्तकशूळाने उचल खाल्लेली होती. हे नेहमीचेच दुखणे आहे. असे समजून त्यांनी त्याकडे कानाडोळा केला. भीमाई अंथरूणाला खिळून गेल्या व त्यांचा आजार दिवसेंदिवस वाढत गेला. त्यांचा आहार कमी होत गेला व त्या प्रकृतीने क्षीण झाल्या. ही

परिस्थिती सुभेदारांना पत्राने कळविली. तेव्हा ते गोरे गावाहून सातारला आले. ते आल्यानंतर तीन दिवसांनी भीमाबाई अत्यवस्थ झाल्या. सर्व मुले त्यांच्या बिछान्या सभोवती गोळा होऊन रडत बसली. चौथ्या दिवशी सकाळी त्यांनी मुलांना जवळ बोलावले. सर्वांना पाहून घेतले, भिवाच्या पाठीवरून हात फिरविला. आणि भीमाईने शेवटचा श्वास सोडला. (१८९६) मुलांनी रडून आकांत मांडला."[३] आईच्या मृत्यू समयी भीमाचे वय अवघे पाच वर्षांचे होते. माता भीमाईने जगाचा निरोप घेतला. बाळ भीवा आणि सर्व भावंडावर दुःखाचा डोंगर कोसळला. तेव्हा पासूनच बाबासाहेबांना दुःखाचा अर्थ कळाला होता.त्या गडद दुःखाचा अनुभव आला होता. ज्यांना दुःखांचा अनुभव आहे. त्यांना दुःखाची जाणीव सुद्धा असते. ती जाणीव त्यांच्या ठिकाणी होती. त्या जाणीवेतूनच वात्सल्य जन्म घेत असते. दुःख माणसाला शहाणं करते. समजदार करते. दुःखीतांविषयी कणव निर्माण करते. बाबासाहेब आपल्या आईच्या मृत्यूनंतर कसे लाडावलो होते. आत्या मिराबाईने लाड केल्यामुळे मी कसा त्याचा गैरफायदा घेतला. आणि वडिलांच्या कष्टाबद्दल कसे अनभिज्ञ होतो हे सांगतात. 'माझ्या सुखासाठी माझे वडिल किती दगदग सहन करीत व नाना तऱ्हेच्या अडीअडचणींना कसे तोंड देत याची मला त्यावेळी मुळीच जाणीव नव्हती."[४] बाबासाहेब वडिलांच्या कष्टाविषयी सांगतात तसे आपल्या लहाणपणी झालेले हाल सांगतात, "ते (वडिल रामजी पिता) गोरेगावी गेले व आम्हां चार मुलांना साताऱ्यास ठेवले. जवळ जवळ चार पाच वर्षे आम्ही भातावर काढली."[५] दुःखाच्या सोबतीनं दारिद्र्य ही सोबतीला होते. त्याच्या सोबत त्यांच्या आयुष्याची जडण-घडण झाली. ही बाब या विषयाच्या अनुषंगाने अतिशय महत्वाची जशी आहे, तशीच ती जमेची सुद्धा आहे.

या जाणीवेमुळेच बाबासाहेब आंबेडकर पुढे आपल्यासाठी झिजलेल्या सर्वच नातेवाईकांच्या आठवणीने सद्गदीत होतात. आणि त्यांचे द्रवलेले मन सांगते, "ज्यांनी ज्यांनी माझे लालनपालन केले त्यातील कोणी जगली नाहीत. ते आज माझं कौतुक पहायला हजर असते तर मला फार आनंद असता."[६] या आठवणी आयुष्याभर ते काढत राहीले. जेव्हा जेव्हा ते एखादे मोठ पद, मोठी पदवी मिळवित होते, त्यावेळी त्यांना आई वडिलांची, आपल्या भावा-वहिणींची, मुलांची, पत्नीची आठवण येत असे. आपले वडिल आपला किती लाड करत

होते, ते किती प्रेमळ होते. या विषयी बाबासाहेब सांगतात, ''मी एखादे पुस्तक मागितले की, ते संध्याकाळ पर्यंत माझ्या वडिलांनी कोठून तरी आणून दिले नाही, असे कधी झालेच नाही. आमची आर्थिक स्थिती खूपच हालाखिची होती, ही गोष्ट मी आत्ताच तुम्हाला सांगितली पण त्यावेळी मला त्या गोष्टीची फारशी जाणीव नव्हती. माझ्या वडिलांचे अंतःकरण थोर यात शंकाच नाही.''[७] १९४७ मध्ये 'नवयुग' या साप्ताहिकाला दिलेल्या मुलाखतीत ह्या आठवणी त्यांनी सांगितल्या. आईच्या मृत्यूनंतर वडिलांनी आपल्यासाठी खस्ता खाल्ल्या. त्या प्रेमळ पित्याचा अंतही मोठा दुःखद झाला. हृदय हेलावून सोडणारा प्रसंग आहे तो बाबासाहेबांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर बडोदा संस्थानात नोकरी करणाऱ्या करारावर महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली होती. त्या कराराची अट पूर्ण करण्यासाठी ते बडोद्याला नोकरीला गेले. बडोद्याला जात असताना पिता रामजी सुभेदार भीमरावांना नोकरी करू नको म्हणत होते. कारण नोकरी करून एकट्या कुटुंबाची सुधारणा होईल. पण आपल्या कोट्यावधी दीन-दुबळ्या अस्पृश्य समाजाची कोण सुधारणा करील? समाज सुधारणेचे बाळकडू वडिलांकडून त्यांनी घेतले. वडिलांनी नको म्हटले तरी सयाजीरावांच्या कराराची अट पूर्ण करण्यासाठी बाबासाहेब बडोद्याला गेले. त्यांचा जातीयवादी कर्मठ हिंदूंनी खूप छळ केला. ते विषमतेचे वार झेलत असताना अचानक वडिल आजारी पडल्याची तार येते. त्या मातृहृदयी कनवाळू पित्याच्या दुःखद निधनाबद्दल बाबासाहेब सांगतात, 'ते एकाएक आजारी पल्याची मला बडोद्यास तार आली. त्या बरोबर बडोद्याहून मुंबईस पोंहचण्यासाठी निघालो. वाटेत सुरत स्टेशनवर वडिलांच्यासाठी सुरतेची बर्फी घ्यावी, म्हणजे त्यांना बरे वाटेल अशी माझी कल्पना, पण बर्फी विकत घेण्याच्या गडबडीत माझी गाडी केंव्हाच निघून गेली. म्हणून दुसरीगाडी सुरतेहून निघेपर्यंत मुकाट्याने वाट पाहात बसण्याशिवाय मला गत्यंतरच नव्हते. त्यामुळे दुसरे दिवशी दुपारी फार उशिरा मुंबईस पोंहलो. घरी येऊन पहातो तो वडिलांची प्रकृती अंत्यवस्थ झालेली व सारी मंडळी त्यांच्या अंथरुणाशेजारी चिंतातूर होवून बसलेली. ते दृश्य पहाताच माझ्या काळजात चर्र झाले. वडिलांनी माझ्या अंगावरून प्रेमाने हात फिरविला व मला एकदा पूर्ण डोळे भरून पाहून त्यांनी आपला प्राण सोडला. केवळ माझ्या भेटीसाठीच त्यांचे प्राण

एक सारखे घुटमळत होते. सुरतेला उतरल्यामुळे त्यांना लवकर भेटता आले नाही. याबद्दल मला अतिशय पश्चाताप वाटला. वडिलांच्या प्रेमख आठवणीनं मी रडत राहिलो.''[८] वडिलांच्या मृत्यूचा घाव भीमरावाच्या मनावर अगदी खोल झाला. पित्याच्या मृत्यूने ते कमालीचे अस्वस्थ झाले. त्यांच्या हळव्या मनाचे आक्रंदन हृदय पीळवटून टाकणारे आहे.

ही व्याकुळता अमेरिकेला जाताना बाबासाहेबांना सतावत होती. भीमरावाच्या मृदू मनावर वज्राघात करत होती. ती व्याकुळता यशवंत मनोहर यांनी नेमक्या शब्दात टीपली आहे. ''भीमराव अमेरिकेला जायला निघाले. त्यावेळी त्यांना वडिलांची तीव्रपणे आठवण झाली. रात्रीच्या अंधारात त्यांनी मनसोक्त रडून घेतलं. आपल्या बापानं आपल्या शिक्षणासाठी किती कष्ट घेतले याची भीमरावाला जाणीव होती. आणि शिक्षणाच्या क्षेत्रातलं हे दैदिप्यमान उड्डाण घेताना हा मनुष्य आपलं कौतुक करायला नाही, यामुळे भीमराव व्याकूळ झाले.''[९] हे दुःख त्यांची सोबत करत हाते. आई वडिल आपले कौतुक करायला, पहायला नाहीत हे पोरकेपण पुन्हःपुन्हा मनाला बैचेन करीत होते, असेच एकदा लंडनला जातानाचा प्रसंग समुद्र प्रवास सुरू झाला. पण मुंबईच्या बंदरावर रमा, यशवंत, आपली भावजयी आणि मुकुंद यांना सोडून जातानाची मनाची शोकाकूल अवस्था एडन् बंदरावरून रमाईला लिहिलेल्या पत्रातून मोठ्या प्रत्ययकारीपणे अभिव्यक्त होते. ते डॉ. करुणा जमदाडे 'रमा' या कादंबरीत लिहितात, ''रमा, तुला सोडून केवळ शरीराने मी लंडनला निघालो आहे. परंतु, माझे मन तुझ्याच भोवती घुटमळते आहे. म्हणूनच तर लंडनला पोंहचण्या अगोदर हे पत्र लिहित आहे. रमा अशात तुझ्या तब्येतीची मला सारखी चिंता वाटते. तुला सोडून असं सतत दूरदेशी जाणं माझ्या ही जिवाला जाळतंय पण काय करणार रामू? आपल्या समोर दुसरा पर्याय नाही.''[१०] रमाई सतत आजारी असायच्या आपल्या पतीस सामाजिक कामात यश मिळावं आणि त्यांच्या शंत्रू पासून त्यांचे रक्षण व्हावे यासाठी भोळी रमाई सतत देवाच्या नावानं उपवास करीत होत्या. त्याचा परिणाम म्हणून त्या आजारी पडत असत. त्या आजाराची सातत्याने चिंता वाहणारे बाबासाहेबांचे मन रमाईच्या भोवती रूंजी घालत असे. सुखदुःखात, दारिद्र्यात भीमरावाच्या पाठीशी ऊभी राहणारी रमाची आस्थेवाईक चौकशी बाबासाहेब

करतात. यशवंत मनोहर रमाई कादंबरीत न्यूयार्कच्या कोलंबिया विद्यापीठातून लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख देतात, ''बोट सुरू होताना तुझ्या डोळ्यातली आसवं पाहिली. मलाही थोडं गलबलून आलं होतं. पण रमा, हे विरह आणि दुःख आपल्याला मोठं करणारी आहेतः रमा! स्वतःला जप या वेड्या वादळाच्या पाठीशी ऊभी राहा. यशवंतला जप.त्याची प्रकृती बरी नसते. काळजी वाटते. सांभाळ त्याला.''[११] कुटुंबाबद्दलची तळमळ, चिंता रमाईस लिहिलेल्या दि.२५ नोव्हेंबर १९२१ च्या एका पत्रातून पुढील प्रमाणे व्यक्त होते. शंकरराव खरातांनी संपादित केलेल्या ग्रंथातील हे पत्र, ''तुझा अभ्यास चालला आहे. ही फार आनंदाची गोष्ट आहे. पैशासंबंधाने तजविज करीत आहे. मी अन्नास मोताद झालो आहे. तेव्हा मजजवळ पाठविण्यास काही नाही. तरीपण तुमचा बंदोबस्त करीत आहे. वेळ जर लागला आणि तुझे पैसे जर संपले तर दागिने मोडून खा. मी आल्यावर तुझे दागिने तुला भरून देईन. यशवंत व मुकुंद यांचे शिक्षण कसे काय चालले आहे? कळविले नाही. माझी प्रकृती ठिक आहे. चिंता नसावी. अभ्यास कांही संपला नाही. जून महिन्यात येणे होईल असे दिसत नाही. पुढे कळविन. सखू व मंजुळा यांच्या संबंधी काही कळत नाही. तुला पैसे पोंहचल्यानंतर मंजुळाला व लक्ष्मीच्या आईस एक एक (प्रत्येकी) लुगडे घेणे. शंकरची काय हाल हवाल? गजरा कशी आहे.''[१२] या पत्राची पडछाया असलेले दुसरे एक पत्र बाबासाहेबांनी त्यांचे सहकारी शिवतकरांना लिहिले आहे. ''आमच्या मुलांच्या शिक्षणाकडे आपण विशेष लक्ष पुरवावे, अशी माझी विनंती आहे. तुर्त रा. वाघमारे यांनी घरखर्च तीन रूपयावर चालविण्यास सांगणे. घरी जरा तंगी आहे. मी परत आल्यावर त्यांच्या उपकाराची '' फेड करीन.''[१३] बाबासाहेबांनी परदेशातून लिहिलेले पत्र आहे. ते दूर देशात असताना आपल्या मुलांच्या शिक्षणाची आरोग्याची चिंता करत होते. रमाईचा आजार दिवसेंदिवस वाढत होता. तो बाबासाहेबांच्या चिंताग्रस्त मनाला टोचणी लावत होता.रमाईला एकाकी सोडून जाण्यास त्यांचे मन धजत नव्हते. नाशिकला भाऊराव गायकवाडांना रमाईच्या आजारपणामुळे मुंबई सोडून येतायेत नसल्या बद्दल लिहितात, ''मी कमिटीच्या कामाकरीता नाशिकला येणार होतो पण, घरी अजूनही बरे वाटत नसल्यामुळे मुंबई सोडून येता येत नसल्यामुळे मुंबई सोडून जाणे अशक्य झाले आहे.''[१४]

बाबासाहेब सामाजिक युद्ध लढत होते अन घरात दारिद्र्याने ठाण मांडले होते. मुलांच्या औषधाला पैसे नसावेत इतके हाल या कुटुंबाचे होत होते. १९१७ च्या सुमारास बाबासाहेब परदेशात शिकत असताना रमेश या त्यांच्या मुलाचा मृत्यू होतो. त्याच्या आजाराबद्दल रमाई बाबासाहेबांना कळवत नाहीत. कारण त्यांच्या अभ्यासात व्यत्यय येईल. पण मुलाचा मृत्यू झाला म्हणून रमाई पत्र पाठवितात, 'हे पत्र वाचून बाबासाहेब क्षणभर थांबले, मन सैरभैर झाले डोळे भरून आले. 'अरे तुझ्या या बापाला न भेटताच गेलास बाळा?' एवढच बोलले. गालावर आसवे ओघळली.''[१५] औषधाला पैसे नसल्याने त्यांच्या गंगाधर या मुलाचा मृत्यू झाला. की घटना अंतःकरणाला चटका लावणारी आहे.सन १९२१ मध्ये गंगाधरच्या मृत्यूने बाबासाहेबांच्या मनाची मोठी करूण अवस्था झाली ते यशवंत मनोहरांनी लिहिले आहे. ''आपल्या गैर हजेरीत मुलगा गेला याचं मात्र भीमरावांना वाईटवाटलं. त्याहून त्यांना वाईट वाटलं ते गंगाधर औषधपाणी नीट न झाल्यामुळे गेला याबद्दल डॉक्टरांची मागील बाकी थकली होती. ती दिल्या शिवाय डॉक्टर औषध द्यायला तयार नव्हते. गंगाधर या परिस्थितीत गेला! गंगाधरच्या वाट्याला हे विचित्रच आलं. भीमरावांना त्यामुळे खूप वाईट वाटलं.''[१६] या नंतर बाबासाहेबांच्या एका मुलीचा मृत्यू झला. ''पुढे त्यांना एक मुलगी झाली. तिचं नाव मोठ्या कौतुकानं त्यांनी इंदू हे ठेवलं, इंदू खूप देखणी होती. नाजूक होती. पण तिचीही प्रकृती यथातथाच होती. १९२४ च्या जानेवारीत ती जन्माला आली आणि कांही दिवसातच गेली.''[१७] दुःखद घटना बाबासाहेबांचा पीछा सोडत नव्हत्या.

१९१७ मध्येच बाबासाहेबांची सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू झाला. बाबासाहेबांना खूप दुःख झाले. त्यांची अंत्यविधी केली. दुसरी आई केल्याबद्दल लहानपणीचा राग कळतेपणात नाहीसा झाला. बाबासाहेबांचे मन श्रावणातील ऊन-पावसा सारखे होते. दुःखांची मालिका मात्र चालू होती. त्यांचे थोरले बंधू आनंदराव यांचा मृत्यू इ.स.१९१८ मध्ये झाला. तर बाळाराम यांचा मृत्यू दि.१२/११/१९२७ ला झाला. त्यावेळी बाबासाहेब अंबादेवीच्या सत्यागृहात व्यस्त होते. जनतेने अंत्यविधी केल्याबद्दल आभार व्यक्त करताना म्हणतात, ''माझ्या गैरहजेरीत ज्या ३-४ हजार अस्पृश्य बंधूंनी प्रेतयात्रेस हजर राहून असल्या दुःखद प्रसंगी आपली सहानुभूती दर्शविली त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.''[१८]

वारंवार होणाऱ्या या घटनांमुळे बाबासाहेब हळवे होत होते. त्यांचे शेवटचे अपत्य राजरत्न रमाईच्या गर्भात असताना डॉक्टरांनी रमाईस पुढे चालून क्षयरोग होवू शकतो असे सांगितले. त्यावेळी त्यांच्या सातत्याने आजारी असलेल्या प्रकृतीस बाळांतपण वर्ज्य करावे लागणार होते. त्यांचे शरीर रोगाने आतून पोखरले होते. या सल्ल्यानुसार बाबासाहेब रमाईस न सांगता त्यांच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. हेतू हा की आपली पत्नी जिवंत राहिली पाहिजे. राजरत्नचा जन्म झाला होता. हे मुल अतिशय तेजपुंज असल्याचे बाबासाहेब सांगत होते. राजरत्न मोठा होत असताना ते मोठे खुष होत होते. रांगत असलेल्या राजरत्नाला पाठीवर घेऊन बाबासाहेब घोडाघोडा म्हणून खेळत होते. पण, नियतीच्या मनात वेगळेच होते. "राजरत्नला डबल न्युमोनिया झाला. प्रकृती गंभीर झाली. भीमरावांना कोर्टात निरोप गेला. लगेच ते घरी आले. रमाचा आणि त्यांचा राजरत्न त्यांना सोडून गेला होता. त्यांच्या मांडीवरच त्याचा जीव गेला होता."[१९] बाबासाहेब मनातून खचले, दुःखाने काठोकाठ रलेले मन त्यांनी दत्तोबा पवार या सहकाऱ्यांकडे पत्र लिहून मोकळे केले, "प्रिय दत्तोबा... पुत्र निधनामुळे आम्हा उभयतांस जो धक्का बसला, त्यातून आम्ही बाहेर पडू असे म्हणणे शुद्ध ढोंगीपणाचे होईल. आतापर्यंत तीन मुलगे आणि एक मुलगी अशा चार लाडक्या बाळांना मूठमाती देण्याचा प्रसंग आमच्यावर ओढवला, त्याची आठवण झाली की, मन दुःखाने खचते... आमचे जीवन आळणी झाले आहे... माझा शेवटचा मुलगा असामान्य होता. त्यांच्या सारखा मुलगा मी क्वचीतच पाहिला असेल. तो गेल्यावर माझे आयुष्य रान माजलेल्या बागेसारखे झाले आहे. दुःखातिशयामुळे पुढे कांही लिहवत नाही. दुःखाने सखंगलेल्या तुझ्या मित्राचा तुला नमस्कार."[२०]

असे दुःखाचे प्रसंग त्यात कुटुंबाची जबाबदारी स्वतःचे कुटुंब अशा दुःखद प्रसंगातून जाताना बाबासाहेब कमालीचे हळवे होतात. अशा प्रसंगी ते एखाद्या लहान मुलासारखे स्फुदूंन स्फुदूंन रडतात. भरीत भर म्हणून आनंदरावांचा मृत्यू होतो आणि त्यांच्या कुटुंबाचीही जबाबदारी त्यांच्यावर पडते. ज. वि. पवार या बाबतीत एका प्रसंगाचे चित्रण करतात, "मुकुंदावर बाबासाहेबांचे अलोट प्रेम होते... आनंदरावांचे निधन मुकुंदरावांच्या बालपणीच त्यांच्या आजोळी म्हणजे गोमेंडी येथे झाले. आपल्या अफाट कामामुळे कौटुंबिक समस्यांकडे लक्ष्य न

देणाऱ्या बाबासाहेबांना मुकुंदरावांची व त्यांच्या आईची जबाबदारी घ्यावी लागली.''[२१] संयुक्त कुटुंबात बाबासाहेब राहिलेले असल्याने या ठिकाणी त्यांच्या हृदयाची विशालता दिसते. यशवंतावर तर जीवापाडप्रेम होतेच पण मुकुंदरावांवरही यशवंत इतकेच प्रेम होते. यशवंतरावांना बाबासाहेब लाडाने सुकड्या म्हणत. मराठीमध्ये एक म्हण आहे, 'घार हिंडते आकाशी लक्ष तिचे पिला पाशी' या म्हणीचा प्रत्यय देणारा पुढील प्रसंग बघा 'योद्धा' या नाटकात भीमसेन देठे लिहितात, डॉ. आंबेडकर म्हणतात, ''पाच-सात दिवसात परत येऊ. माझी कसलीही काळजी करायची नाही. तुझ्या तब्येतीची काळजी घे. आपला सुकड्या सारखा बाहेर खेळतोय त्याला अभ्यासाला बसवत चल.''[२२]

कुटुंबावर आलोट मायादाखविणारे बाबासाहेब होते. मध्येच त्यांच्या संसाररूपी रथाचे एक चाक निखळून पडते तेव्हा ''२७ मे १९३५ रोजी रमाबाईंचे निधन झाले. याचा जबरदस्त धक्का डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बसला. यशवंतही या धक्याने ४ महिन्यानी आजारी पडले. बाबासाहेबांनी कांही दिवस त्यासाठी वकिली सोडली व प्रसिद्ध डॉ. दस्तूर यांना राजगृहावर आणून यशवंतची प्रकृती तपासली त्याच दरम्यान केरळचे भास्करन बाबासाहेबांना भेटण्यास आले होते. त्यांनी यशवंतची प्रकृती पाहून कोचिन (केरळ) येथील वैद्याकडे नेण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे बाबासाहेबांनी शंकर मामा सोबत त्यांना कोचिनला उपचारार्थ पाठविले. त्या उपचारांनी त्यांची प्रकृती सुधारली.''[२३] रमाईच्या निधनाने बाबासाहेबांनी सन्यासी वृत्तीने राहतात तसेच वस्त्र परिधान करतात याबाबतीत य.गो. दुर्गे लिहितात,

''स्मशान यात्रेहून आल्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरी आपली पत्नी रमाबाईच्या वियोगाच्या दुःखाने विव्हळत आपल्या अभ्यासिकेमध्ये एकटेच पडून राहात. धैर्याचा मेरूमणी समजला जाणारा अस्पृश्यांचा हा महान नेता साध्वी रमाबाईच्या मृत्यूनंतर सुमारे एक आठवडाभर अज्ञ बालकाप्रमाणे ओक्साबोक्सी रडत होता.''[२४] या दुःखातून बाबासाहेब कसे बसे सावरले परंतु, अनेक व्याधींनी त्यांचे शरीर पोखरत होते. त्या बाबतीत खुद्द ते म्हणतात, 'चि. यशवंतच्या आईच्या मृत्यूनंतर लग्न करावयाचे नाही असा माझा निश्चय होता. परंतु प्राप्त परिस्थितीत मजवर माझा निश्चय मोडण्याची पाळी आलेली आहे. डॉक्टर

स्पष्टपणे म्हणतात की, 'लवकर मरणे किंवा लग्न करणे' यातून कोणती तरी गोष्ट करणे भाग आहे.''[२५]

दरम्यानच्या काळात यशवंत आणि मुकुंदची बाबासाहेब खूप काळजी घेत होते. त्यात त्यांना मधुमेहाचा आजार जडला होता, निद्रानाश हा ही आजार जडला होता. त्यासाठी त्यांना वारंवार डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागायचा. सार्वजनिक कार्यामुळे आहार, निद्रा यामध्ये अनियमितता येऊ लागली. त्याचा परिणाम आरोग्यावर होवू लागला. त्यातून डॉ. शारदा कबीर यांची ओळख झाली. डॉ. शारदा कबीर यांच्या सोबत दुसरा विवाह झाला. एका गरजेतून विवाहाची अपरिहार्यता दिसून येते. बाबासाहेबांबद्दल डॉ. शारदा उर्फ सविता आंबेडकर लिहितात, ''माझ्या प्रत्येक गोष्टीत ते जातीने लक्ष घालीत असत. विशेषतः कपड्यांच्या बाबतीत पसंद त्यांचीच असे.''[२६] बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाविषयी डॉ. सविता आंबेडकरच लिहितात, ''एखाद्या खडकाखाली शुद्ध नि निर्मळ असा झरा असावा तसे डॉ. आंबेडकरांबाबत ही दिसून येईल. त्यांचा चेहरा कांहीचा उग्र व एकूण व्यक्तिमत्वाला गांभीर्याची नि अखंड अभ्यासू वृत्तीमुळे भव्य तेजाची जोड मिळालेली होती. पण त्यांचे मन व अंतःकरण किती निर्मळ, कोमल व भावनाप्रधान होते. याची प्रचिती त्यांच्या पत्रांमधून पावलो पावली येते.''[२७] दुसऱ्या पत्नीसोबही ते एवढ्या आत्मियतेने वागत असत.हे याच ग्रंथाच्या पृष्ठ क्रमांक ७६,७७ वरील उल्लेख बाबासाहेबांवर आरोप करणारे आहेत. डॉ. सविता आंबेडकरांनी, बाबासाहेब आणि रमाईच्या संबंधामध्ये शैक्षणिक करणांनी दुरावा असावा असे मत ठोकून दिले आहे. ते मुळीच योग्य वाटत नाही. हे मत बाबासाहेबांबद्दल संशयाचे वातावरण निर्माण करणारे तर आहेच परंतु, बाबासाहेब निरक्षरांचा द्वेष करणारे अहंकारी असावेत असेही यातून ध्वनीत होते. बहिष्कृत भारत शुक्रवार दि. ३ फेब्रुवारी १९२८ च्या अंकातील पृ. १४ वरील रमाईबद्दलच्या अतिशय कृतज्ञता व्यक्त करणारा उल्लेख डॉ. सविता आंबेडकरांनी पहायला हवा होता. म्हणजे रमाई आणि बाबासाहेबांमधील प्रेम, जिव्हाळ्याचे संबंध ज्ञात झाले असते. रमाई आणि बाबासाहेबांच्या दुराव्याचे खरे कारण याच शोधनिबंधात वर मांडलेलेच आहे. रमाई बद्दलचे प्रेम कमी झाले नव्हते.

आणि दुसरे लग्न झाले तरी बाबासाहेबांचे यशवंतराव आणि मुकुंदरावरचे प्रेम कमी झाले नव्हते. उलट दुसऱ्या पत्नीच्या हेकट आणि संकोचित वृत्तीमुळे त्यांचे अधीकच मन ओढले जात होते. त्याचे शेकडो पुरावे व संदर्भ देता येतील. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांनी दोघा पिता-पुत्रामधील बिघडविण्याचे काम केले होते. हे आता उघडे झाले आहे. या विषयी दि.०३. ०४. १९४८ रोजी कमलाकांत चित्रे यांना बाबासाहेबांनी लिहिलेल्या पत्राचा दाखला खुद्द डॉ. सविता आंबेडकरांनीच दिला आहे. ''आपला एक घनिष्ट सहकारी (त्यांचा संकेत जाधवांकडे होता.) यशवंत व डॉ. कबीर यांची मने एकमेकांविषयी कुलषित करीत आहेत.''[२८] अशा कृतघ्न सहकाऱ्यांचा चांगलाच अनुभव बाबासाहेबांना होता. परंतु यशवंत उर्फ भय्यासाहेबांना मात्र आपल्या वडिलांचा स्वभाव माहित होता आणि म्हणूनच यशवंतराव वडिलांबद्दल लिहितात, ''शाळेतील शिक्षणापेक्षा आपण एखादा छापखाना काढावा असे लहानपणापासून मला वाटे. पुढे साहेबांना ही गोष्ट पटली व त्यांनी मला छापखाना काढून देऊन माझी हौस पुरविली. पण साहेबांशी विरोध असलेल्या लोकांनी तो माझा छापखाना गेल्या वर्षी जाळून टाकला.''[२९] बाबासाहेबांचे विरोधक असे विध्वंसक होते. भय्यासाहेबांनी दिलेला हा पुरावा विश्वासू समजावा लागतो. आनखी कांही आठवणी भय्यासाहेब हे बाबासाहेबांबद्दल सांगतात, या विषयाच्या अनुषंगाने महत्त्वाच्या आहेत.'मी सुद्धा चांगला पोशाख करावा असा त्यांचा कटाक्ष असतो.''[३०] बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाविषयी पुढील आठवण अशी आहे. ''ते चेहऱ्यावरून उग्र, गंभीर दिसत असले तरी ते अत्यंत मयाळू आहेत, याचा आम्हाला नेहमीच अनुभव येतो. एकदा जिन्नसमागितला तर तो आम्हाला केंव्हाही मिळतो.''[३१] लंडनहून लिहिलेल्या यशवंताच्या पत्रातील पुढील मजकूर पहा, ''तुला लंडन मध्ये शिक्षणासाठी ठेवण्याचा माझा निर्धार आहे. परंतु माझे मन द्विधा होते. तुझी प्रकृती ठिक नसते. तेथील हवामान तुला मानवेल की नाही.''[३२] ५ सप्टेंबर १९५१ ला भय्यासाहेबांना बाबासाहेब एक पत्र पाठवतात, ''माझी गाडी मनमाडहून सुटली तरी तू मनमाडला पोंहचला नव्हतास. त्यामुळे दिल्लीत पोंचे पर्यंत तू सुखरूप आहेस की नाहीस अशी मी काळजी करीत होतो. आर. आर. पवार यांची तू सुखरूप असल्याची तार आली तेंव्हा मनाला ' बरे वाटले.''[३३] भय्यासाहेबांच्या

आजाराविषयी सुद्धा चिंता व्यक्त करतात. भाऊराव गायकवाड यांना दि. ८. ११. १९३५ च्या एका पत्रात ती चिंता अशी व्यक्त करतात. "चि. यशवंताच्या प्रकृतीत काही सुधारणा नाही. म्हणूनच मी अतिशय चिंतेत आहे."[३४] एवढेच नाही तर मुलांच्या स्वास्थ्यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल शंकरराव खरात लिहितात, "स्वतः डॉ.बाबासाहेब यांनी त्यांचा मुलगा चि. यशवंत व पुतण्या मुकुंद यांना प्रकृती स्वास्थ्यासाठी अमृतसरला बरेच दिवस ठेवले होते."[३५] भय्यासाहेबांना छातीमध्ये त्रास होत होता. डॉक्टर ऑपरेशन करावे म्हणत होते. परंतु बाबासाहेबांनी हृदयरोगतज्ञ डॉ. जोशींना फोन करून 'ऑपरेशन न करता औषधापचाराने बरे करा' असे सांगितले. डॉक्टरांनी त्यांच्या म्हणण्यानुसार भय्यासाहेबांना आजारातून बरे केले. मिराताई आंबेडकर ह्या बाबासाहेबांच्या सुनबाई आहेत. त्यांना भय्यासाहेबांनी बाबासाहेबांची आठवण सांगितली. ती आठवण मिराताई लिहितात, "भय्यासाहेबांनी बाबासाहेबांबद्दल सांगितलेली दुसरी आठवण म्हणजे आपल्या मुलाचा उदरनिर्वाह व्यवस्थित चालावा म्हणून बाबासाहेब भय्यासाहेबांना दरमहा रू. ४५० त्याकाळी पाठवित होते. आपल्या मुलाचा खर्च बाबासाहेब न चुकता दर महिन्याला पाठवित होते. हे कित्येकांना माहित नसेल. मुलामध्ये आणि बाबामध्ये मतभेद निर्माण करण्याचे काम त्यावेळी अनेकांनी केले. पण बाबासाहेबांनी मुलांवरचे प्रेम जराही कमी होऊ दिले नाही."[३६] बाबासाहेबांनी स्वतःचे दुसरे लग्न करण्या अगोदर यशवंतरावांशी चर्चा करून सहमती घेतली होती. तर डॉ. शारदा कबीर यांना आपल्या एकुलत्या एका मुलासोबत वात्सल्याचे संबंध ठेवण्याविषयी दि. ९. ४. १९४८ चे पत्र पहा. "मी तुला माझ्या मुलांबद्दल लिहिले. याचे कारण असे की, सावत्र मुले आणि सावत्र आई यांच्यातील संबंध सहसा सुखाचे नसतात. हे मला माहिती आहे. हे दुःखद संबंध पूर्वग्रहापासून सुरू होतात. आणि सर्वांचा आनंद हिरावून घेणाऱ्या अंतर्विग्रहात त्यांचे पर्यवसान होते. हे होऊ नये अशी माझी इच्छा आहे."[३७] भय्यासाहेबांच्या लग्नाबद्दल भाऊराव गायकवाडांना दि. ३. ६. १९४९ ला पत्र लिहून कळवितात, "चि. यशवंतांची लग्न करण्याची इच्छा आहे. त्यांच्या करीता मी मुलगी पहात आहे.चांगली मुलगी आपल्या पाहण्यात आहे का?"[३८] या पत्रात यशवंतासाठी मुलगी दिसायला सुंदर, चांगले व्यक्तिमत्व, कुलशीलाने चांगली असावी. पण ती

अगदीच लहान नसावी अशा सुचना देतात. रेवाराम कवाडेंनाही नागपूरकडे मुलगी पहायला सांगतात. तसेच आपले सहकारी पा. ना. राजभोज यांच्या मुलींविषयी ही विचारणा करतात. राजभोज जरी चर्मकार होते. जातीअंतांची लढणारे बाबासाहेब जातीला महत्त्व देत नव्हते.

या मुद्याच्या अनुषंगाने बाबासाहेबांनी यशवंतांशी चर्चा केली होती. आणि मुलाने पसंत केलेल्या मुलीला सहमती दिली होती. त्याबद्दल मिराबाई आंबेडकर लिहितात, 'आम्ही खारला घरी पोंहचल्यावर दुसऱ्या दिवशी भय्यासाहेबांचा निरोप आला. बाबासाहेबांशी सल्ला मसलत करून १९ एप्रिल १९५३ ही लग्नाची तारीख निश्चित केली.''[३९] असे असताना यशवंतरावाच्या लग्नाबद्दल बाबासाहेब सहमत नव्हते अशी अ'वा परसवून गैरसमज निर्माण करून देण्यात आले. लग्नाच्या दिवशी बाबासाहेब मुंबईमध्येच होते. बाबासाहेबांनी यशवंताच्या लग्नाला जाण्यासाठी वाराळेंना आपणास घेऊन जाण्यासाठी सांगितले होते. परंतु, कांही दुष्ट सहकारी आणि सावत्र आईचे ह्दय असलेल्या डॉ. सविता आंबेडकरांनी बाबासाहेबांना आपल्या पोरक्या मुलाच्या लग्नाला हजर राहू दिले नाही. या घटनेच्या वेगवेगळ्या दंतकथा तयार केल्या आहेत.त्यापैकी एन. एम. कांबळे यांनी लिहिले, ''मी पहिले बाबासाहेबांनी कुस बदलली... डोळ्याला रूमाल लावला. इतका वेळ दाबून ठेवलेल्या अश्रूंना वाट करून दिली. क्षणभर मी सुद्धा सद्गदीत झालो. अनेक मुलांना मातीच्या स्वाधीन करणारे बाबासाहेबांचे हात आपल्या एकुलत्या एका पुत्राच्या लग्नाला हजर राहता येत नाही म्हणून अश्रू पुसू लागले. आपल्या काळजाच्या घडावर आलोटप्रेम करणारे परंतु त्यांचे प्रदर्शन न करणारे बाबासाहेब अगतिकपेण किती वेळ रडत राहिले असतील कुणास ठाऊक.''[४०] या षडयंत्रामागे कुणाचा हात होता? एका महापुरुषाचा त्यांच्या जवळची माणसे कसा छळ करीत होते त्याचा हा नमुना आहे. यशवंतांच्या लग्नाबद्दल बाबासाहेबांच्या दुसऱ्या पत्नी सविता आंबेडकर लिहितात, ''पुढे यशवंतने आपल्या पसंतीने लग्न केले. त्या दिवशी आमचा मुक्काम मुंबईतच होता. मी साहेबांना लग्न समारंभाला येण्याचा खुपच आग्रह केला. ते आनंद भवनच्या तळ मजल्यावरील त्यांच्या खोलीत सोप्यावर पहुडलेले होते. यशवंताच्या लग्न समारंभाला जाण्यासाठी मी कपडे करून आले व त्यांनाही तयार होण्यासाठी

विनवू लागले. त्यांनी अर्ध्याबह्यांचा सदरा व पांढरी लुंगी परिधान केलेली होती. मी गेल्यावर ते उठून बसले. व मला म्हणाले ''मला बरे नाही, मला नाही यायचे! तुला जायचे तर तू खुशाला जा, मी तुला काही अडवून धरलेले नाही.'' मी त्यांना विनवण्या केल्या पण ते कांही यायला तयार झाले नाही. त्यांनी कागद पेन्सिल घेतली व बुद्धांची चित्रे काढण्यात ते दंग झाले.''[४१] या प्रसंगाला अतिशय नाट्यमय वळण दिल्या गेले. एन. एम. कांबळेंनी बाबासाहेब यशवंतरावांच्या लग्नाला जावू शकले नाहीत त्या बद्दल त्यांना रडताना पाहिले. तर सविताबाई आंबेडकर म्हणतात की, ते बुद्धाचे चित्र काढत बसले होते. त्या असेही म्हणतात की, मी आणि माझ्या बहिणी नातेवाईक लग्नाला गेलो होतो यशवंत आणि त्यांची पत्नी आशिर्वादासाठी जेंव्हा भेटायला आले तेव्हा बाबासाहेब त्यांना तुटक बोलले हे लिहून पुढे एक महत्त्वाची नोंदही करायला विसरत नाहीत की, 'बाबासाहेब मुंबईत असून एकुलत्या एका मुलाच्या लग्नाला ते का गेले नाहीत हे सुज्ञ वाचकांना न सांगितलेले बरे.' सविता आंबेडकरांनी या प्रकरणात काय केले होते याचा ठळक पुरावा मिराताई आबेडकर देतात तो उल्लेख नोंदविल्या शिवाय या घटनेतील सत्य बाहेर येऊ शकत नाही. ''लग्न समारंभ आटोपल्यावर आम्ही बाबासाहेबांना भेटायला गेलो. आमच्या सोबत शंकरानंदशास्त्री आणि वराळे मामाही होते. बाबासाहेब झोपले होते. त्यांची प्रकृती ठिक नव्हती. आमच्या येण्याच्या चाहुलीने बाबासाहेब उठले आणि म्हणाले, 'अरे लग्न झाले पण?' बाबासाहेबांनी आम्हाला आशीर्वाद दिला. आणि सिद्धार्थ कॉलेज मधून दहा-पंधरा मिनिटात निघालो. नंतर बाबासाहेब व वराळे मास्तरांवर चिडले. बाबासाहेबांनी वराळेंना कॉलेजवर बोलावले होते लग्नाला जाण्यासाठी पण माईंनी वराळेंना घेऊन जाण्यास मज्जाव केला होता. माईंनी वराळेंना सांगितले, 'साहेबांची प्रकृती ठिक नाही, म्हणून त्यांना इंजेक्शन दिले आहे. ते झोपले आहेत.' हा सर्व भाग वराळे मामांनी बाबासाहेबांना सांगितला. लग्नाला उपस्थित राहता आले नाही. याची खंत बाबासाहेबांना वाटली. म्हणून ते माईंवर चिडले. शंकरानंद शास्त्रींना म्हणाले, 'माझ्या एकुलत्या एक मुलाच्या लग्नाला हजर राहता आले नाही.''[४२] बाबासाहेबांच्या मनाची झालेली अवस्था या प्रसंगातून पहायला मिळते. जर त्यांना यशवंताचे लग्न मान्य नसते तर पुढील आयुष्यात

पितापुत्राचे जमले नसते. दुसरे असे की, पित्याने पुत्रास पुढे आर्थिक मदत केली नसती. त्याला झालेल्या मुलाचे कोडकौतुक केले नसते. आणि पुत्राने पित्याचे मिशन पुढे चालू ठेवले नसते. परंतु वरील सर्व बाबी लक्षात घेता पितापुत्राचे खूप चांगले जमत होते. किती ही केले तरी पोटचा गोळा होता भय्यासाहेब. माईसाहेब आंबेडकर यशवंतरावांना पती आणि आपल्या मधील अडचण समजत असाव्यात. परंतु यशवंतराव बाबासाहेबांचा जीव की प्राण होते. कांही स्वार्थांध मुर्ख पुढाऱ्यांनी पितापुत्रात गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु वाघीणीची नखं तिच्या पिलांना लागत नसतात. हे अल्प बुद्धीच्या लोकांना कुणी सांगावे? भय्यासाहेब आणि मिराताई बाबासाहेबांना दिल्लीला भेटायला गेल्याचा एक प्रसंग बघितल्यास त्यातून बाबासाहेबांचे वात्सल्य कसे पोटातून होते हे पटते. तो अधोरेखीत करणारा पुढील प्रसंग बघावाच लागेल, मिराताई आंबेडकर एक आठवण अशी सांगतात, ''माईचा निरोप आला की दिल्लीत पाहुणे खूप आले आहेत, बंगल्यात जागा नाही सुदामने आम्ही आल्याची खबर देण्यासाठी बाबासाहेबांकडे धाव घेतली. बाबासाहेब भेटण्यासाठी आले. त्यांनी ही तोच प्रश्न केला. बाबासाहेब म्हणाले, 'येथे इतक्या खोल्या रिकाम्या पडल्या आहेत, तुला हॉटेलमध्ये थांबण्याची गरज काय?' इतकं सगळं होत असतानाही भय्यासाहेबांनी माईच्या अशा वागण्याची कल्पना दिली नाही.''[४३] ही माया भय्यासाहेबांच्या मुलांबद्दलही होती.प्रकाशला सर्दी-ताप झाली होती. या प्रसंगीसुद्धा ते खूप काळजी घेतात. मिराताई १४ एप्रिल या बाबासाहेबांच्या वाढदिवसाचा एक प्रसंग सांगतात, ''बाबासाहेब जयराज हाऊसमध्ये पहिल्या मजल्यावर थांबले होते. त्यांना नारायणदादांना बघताच विचारले 'माझा नातू कुठे आहे?' मग मी आतमध्ये गेले, बाबासाहेबांना नमस्कार केला. आणि प्रकाशला बाबांकडे दिला. प्रकाश बाबासाहेबांकडे खेळत होता.''[४४]

बाबासाहेब वात्सल्याची साक्षात मुर्ती होते. जो व्यक्ती कुटुंबावर प्रेम करतो ते व्यक्ती समाजातील लोकांवर सुद्धा प्रेम करतो. बाबासाहेबांचे मुलांवर प्रेम होते आणि आपल्या मुलांसारखे इतर मुलं दिसले की त्यांचे प्रेम आसंडून वहात असे. भालचंद्र वराळे हा विद्यार्थी मांसाहारी जवेण करत नव्हता तेंव्हा त्याच्यासाठी दुसऱ्यादिवशी गोड खीर तयार करून मनसोक्त खाऊ घालणारे

मातृहृदयी बाबासाहेब या बाबतीत घडलेला एक प्रसंग भालचंद्र वराळे सांगतात, ''मला गोड आवडते म्हणून एवढ्या मोठ्या महापुरुषाने माझ्यासारख्या अतिसामान्य पोरासाठी स्वतः खीर करण्याची तसदी घ्यावी. कशी आठवावी आई मला?''[४५] कुटुंबाबाहेरील मुलास सुद्धा बाबासाहेब आईची माया देत असत. असे किती तरी प्रसंग आहेत. ते आपल्या कार्यकर्त्यांवर ते मुलासारखेच प्रेम करत होते. अमृतराव रणखांबे हे आजारी असतात तेव्हाही कुटुंबातील प्रमुखासारखेच चिंता करत असत. त्याबद्दल भाऊराव गायकवाड यांना दि. ३. ६. १९३४ मध्ये लिहिलेल्या पत्रावरून दिसून येते. दि. २९. ५. ३१ च्या भाऊरावांना लिहिलेले असेच पत्र आहे.

बाबासाहेब आपल्या आईच्या आठवणीने सद्‌गदीत होत असत. दत्तोबा पवारांना साताऱ्यास आल्यावर त्यांनी आठवण सांगितली, 'सातारा येथील एका मैदानात थांबले. एके ठिकाणी थांबून ते म्हणाले, 'आई, मी आलो आहे, बाबा रडू लागले. दत्तोबा, येथे माझ्या आईच्या अस्थी आहेत. तिने आम्हा सर्व भावंडांसाठी फार खस्ता खाल्या. त्या पलिकडच्या पडक्या घरात आम्ही कांही दिवस राहत होतो. कांही दिवस आमची आई व भावंडे या सडकेवर खडी' फोडून मोल मजुरी करीत होतो. मी या रानात लहानपणी खूप खेळलो आहे. माझी आई व बाबा मी शिकलो हे बघावयास जगले नाहीत. मी फार दुर्दैवी आहे.''[४६] आई वडिलांविषयी ह्या भावना बाबासाहेबांच्या होत्या. आणि डॉ. सविता आंबेडकर सांगतात की, 'आपल्या हाताने स्वयंपाक करून दुसऱ्यांना जेवू घालण्यात धन्यता मानत.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल अनेक गैरसमज पसरविण्यात आले होते. आजही ते गैरसमज काही लोक पसरवत असतात. त्यांच्याबद्दल खोटे पत्र, दस्तऐवज तयार करून अधून मधून त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. त्यांचे स्वातंत्र्य युद्धात योगदान नसल्याबद्दल असेच सांगितले जाते. त्याप्रमाणे त्यांचा स्वभाव गंभीर होता. किंवा देशव्यापी अस्पृश्यांच्या मुक्ती लढ्यामुळे कुटुंबाकडे लक्ष नसावे. किंवा ते रमाई पासून दूर राहत होते. या सर्व बाबींचे आपण ससंदर्भ विवेचन करून त्यांच्याबद्दल जे या बाबतीतील आरोप, गैरसमज आहेत. ते दूर केले आहेत. आणि या शोध निबंधात गृहीत धरलेल्या कांही मुद्यांना अनूसरून कांही निष्कर्ष काढले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रीक पास झाले तेंव्हा दादा केळुसकर गुरूजी यांनी भगवान बुद्धांचे चरित्र भेट दिले. त्या वेळेपासून बुद्धांच्या जीवनाचा अभ्यास व चिकित्सा त्यांनी केली. त्यात भगवान बुद्धांनी सांगितलेले तत्तज्ञान प्रज्ञा–शील–करूणा, दया, क्षमा, शांती या तत्वांबरोबरच 'तृष्णा हे दुःखाचे मुळ आहे.' जग दुःखमय आहे. या तत्वज्ञानाचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर असल्याने त्यांच्या जीवनात अनेक दुःखांचे प्रसंग आले. तरीही प्रेम, शांती, दया, वात्सल्य या भावना यांच्या मनात वाढीला लागल्या. या पर्श्वभूमीवर कांही निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवता येतील.

कांही मतांचा आढावा घेता १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता ममतेचे मायाळू रूप होते, २) त्यांच्या बलाढ्य देहात मातृरूपी वात्सल्य ओतपोत भरलेले होते. ३) चेहरा उग्र जरी असला तरी बाबासाहेब कुटुंब वत्सल्य आणि परोपकारी होते. ४) ते जगात कुठेही असले तरी त्यांचे लक्ष कुटुंबावर विशेषतः भय्यासाहेबांवर होते. ५) बाबासाहेब हळव्या संवेदनशील मनाचे होते म्हणूनच ते वात्सल्याचे मुर्तीमंत उदाहरण होत.

**संदर्भ**


१) कर्डक वामन – महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाड्मय, खंड – २, संपादक–माधवराव गायकवाड, प्रा. सागर जाधव–आलोक–संबोधी प्रकाशन, यवतमाळ, प्र.आ.१५ मे २०१० पृ.१४.

२) आंबेडकर डॉ. भी.रा. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, संपा.–शंकरराव खरात–इंद्रायणी साहित्य, शनिवार पेठ, पुणे., प्र.आ.१५ मार्च १९८७ पृ.७–८

३) खैरमोडे चा.भ.– डॉ. भीमराव रामजी आंबेडकर – खंड –१, सुगावा प्रकाशन, पुणे. पा.आ.२००२, पृ.५०–५१.

४) आंबेकर, (डॉ.) भी.रा. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, संपा.– शंकरराव खरात– इंद्रायणी साहित्य, शनिवार पेठ, पुणे. प्र.आ.१५ मार्च १९८७ पृ. १८.

५) कित्ता– पृ.१४

६) कित्ता- पृ. ८. ९.

७) कित्ता- पृ. १७

८) आंबेडकर (डॉ.) बाबासाहेब- माझी आत्मकथा - गजेंद्र विठ्ठल रघुवंशी

२४२ (ब) शुक्रवार पेठ, पुणे,- पृ. १४-१५.

९) मनोहर, यशवंत - रमाई, अमोल प्रकाशन, नाचोना (लेहगांव) प्र. आ. १९९१, पृ. ४९.

१०) जमदाडे, (डॉ.) करुणा भीमराव - रमा, इसाप प्रकाशन, नांदेड, प्र. आ. १९९९, पृ. १३८.

११) मनोहर, यशवंत - रमाई, अमोल प्रकाशन, नाचोना (लेहगांव) प्र. आ. १९९१, पृ. ५०-५१.

१२) आंबेडकर (डॉ.) भीमराव रामजी- डॉ. बाबासाहेब यांची आत्मकथा, संपादक- शंकरराव खरात-इंद्रायणी साहित्य, पुणे, प्र. आ. १९८७, पृ. ३७ - ३८.

१३) आंबेडकर, (डॉ.) भीमराव रामजी - समकालीन सहकाऱ्यांच्या आठवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर - संपादन - संकलनःविजय सुरवाडे, लोकवाङ्मयगृह, ति. आ. डिसेंबर २०१०. पृ.१८७.

१४) आंबेडकर, (डॉ.) भीमराव रामजी - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे- संपादक, शंकरराव खरात, पृ.३६.

१५) मनोहर, यशवंत - रमाई, अमोल प्रकाशन, नाचोना (लेहगांव) प्र. आ. १९९१, पृ. ५४-५५.

१६) कित्ता - ६२-६३.

१७) कित्ता -६३.

१८) आंबेडकर, (डॉ.) भीमराव रामजी - पा. बहिष्कृत भारत - दि. २५. ११. १९२७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक संपा. वसंत मून - शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई, नोव्हेंबर १९९०, पृ. १३५ (९).

१९) मनोहर, यशवंत - रमाई, अमोल प्रकाशन, नाचोना (लेहगांव) प्र. आ. १९९१, पृ .६४.

२०) आंबेडकर (डॉ.) भीमराव रामजी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड - २, लेखक - चां. भ. खैरमोडे, या पुस्तकात पत्र उद्धृत - पृ. १०३-१०४.

२१)	पवार, ज. वि. - मुकुंदराव आंबेडकर, (प्रस्तावना) अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई प्र. आ. २०१४, पृ. ०९.

२२)	देठे, भीमसेन - योद्धा, वांङ्मय सेवा प्रकाशन, नाशिक रोड - प्र. आ. १५ जानेवारी २००५, पृ. २५.

२३)	सुरवाडे विजय - समकालीन सहकाऱ्यांच्या आठवणीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर - तळटीपा - संपादन- लोकवाङ्मयगृह, ति. आ. डिसेंबर २०१२, पृ.१८७.

२४)	दुर्गे, य. गो.- रमाबाई आंबेडकर- शशी एजन्शी, बोरगांव (मेघे) वर्धा, प्र.आ. १९८९, पृ.८६.

२५)	आंबेडकर (डॉ.) भीमराव रामजी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा - संपादक - शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य, पुणे., प्र. आ. १५ मार्च १९८७., पृ. २८८,

२६)	आंबेडकर (डॉ.) सविता भीमराव - डॉ. आंबेडकरांच्या सहवासात, तथागत प्रकाशन ठाणे-पृ. ७५.

२७)	कित्ता - पृ. ७९.

२८)	कित्ता - पृ. ९४.

२९)	आंबेडकर भय्यासाहेब - वडिलांबद्दल मला काय वाटतं, सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर- संपादक- ज.वि.पवार, पृ.३७.

३०)	कित्ता - पृ.३६-३७.

३१)	कित्ता - पृ. ३५.

३२)	पवार ज.वि. - स्मृतीची पाने चाळण्याआधी - सूर्यपुत्र भाय्यासाहेब आंबेडकर - संपादक - ज. वि.पवार - पृ. २७.

३३)	आंबेडकर, (डॉ.) भीमराव रामजी - भय्यासाहेब आंबेडकर एक वादविवाद - संपादन - प्रा. भारत सिरसाठ - साद प्रकाशान, औरंगाबाद, प्र. आ. २०१०, पृ. ४५.

३४)	आंबेडकर (डॉ.) भीमराव रामजी - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, संपादन शंकरराव खरात - पृ.१६२.

३५)	कित्ता - १६१.

३६) आंबेडकर, मिराताई – सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर, संपादक – ज. वि. पवार, पृ. १७५.

३७) रत्तू, नानकचंद – डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, (भाषांतर – भा. ल. भोळे) प्र. आ. १९९८, पृ. १०७.

३८) आंबेडकर (डॉ.) भीमराव रामजी – डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे– संपा. शंकरराव खरात– पृ. २८३ वर उद्‌धृत.

३९) आंबेडकर, मिराताई – भय्यासाहेबांची जबाबदारी पेलताना – सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर संपा. ज. वि. पवार, पृ.१७२.

४०) कांबळे, एन. एम. – असे होते आमचे भय्यासाहेब – सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर– संपादक– ज. वि. पवार, दी बुद्धीस्ट सोसायटी ऑ' इंडिया, प्र. आ. ६ डिसेंबर २०००, पृ. ८८.

४१) आंबेडकर, (डॉ.) सविता भीमराव – डॉ. आंबेडकरांच्या सहवासात, तथागत, प्रकाशन, ठाणे,पृ.१४४.

४२) आंबेडकर मिराताई – भय्यासाहेबांची जबाबदारी पेलताना – सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर, संपादक ज.वि.पवार, दी बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया, प्र. आ. ६ डिसेंबर २०००. पृ. ८८.

४३) कित्ता – पृ. १७४.

४४) कित्ता – पृ. १८०.

४५) ऊाळे, न्यायमूर्ती भालचंद्र– मंतरलेले दिवस, आठवणीतले बाबासाहेब, संपादक– योगीराज बागूल, ग्रथाली प्रकाशान, मुंबई– प्र.आ. ९ आक्टोबर २००८, पृ. ६२.

४६) आंबेडकर बाबासाहेब – माझी आत्मकथा– डॉ. बाबासाहेब आंबेडकर– प्रकाशक गजेंद्र विठ्ठल रघुवंशी–२४२(ब) शुक्रवार पेठ, पुणे – २ पृ. १५६.

***

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani